CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ४ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १८५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

**१६ वा सामना**

Lucknow Super Giants Vs Mumbai Indians

लखनौ सुपरजाएंटस् वि. मुंबई इंडियन्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : लखनौ



**सोलापूर शहराचे तापमान**

कमाल तपमान ३८.५

किमान तपमान २५.१

# सख्ख्या नणंदेचे मेव्हण्यासोबतचे लफडे बाहेर काढले बार्शीत नवऱ्यासह तिघांनी विवाहितेचे मुंडन केले !

**डोक्याच्या मुंडणासह भुवयांवरुन ट्रिमर फिरवून चेहरा केला विद्रुप**

**विवाहितेच्या छळवादाचा अक्षरश: कडेलोट**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

नणंदेचे मेव्हुण्यासोबत असलेले लफडे का बाहेर काढले? या कारणावरुन संतापाचा उद्रेक झालेल्या घरातील तिघांनी एक विवाहित महिलेच्या छळवादाचा अक्षरश: कडेलोट केला. तिचा शारीरिक छळ करताना जबरदस्तीने तिच्या डोक्याचे मुंडन केले. याशिवाय तिच्या डोळ्यांच्या दोन्ही भुवयांवर ट्रिमर फिरवून तिचा चेहरा पूर्णपणे विद्रुप करण्याचा विकृत प्रकार केला. बार्शी शहरातून एक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने येथील पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर संबंधित तिघा संशयितांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान जबरदस्तीने डोक्याचे मुंडन करण्यासह भुवयांवरुन ट्रिमर फिरवून चेहरा पूर्णपणे विद्रुप करण्याच्या प्रकाराने बार्शी शहरासह तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात प्राप्त माहितीनुसार, 'या' पीडित महिलेचे २०१६ साली लग्न झाले. सुरुवातीला सर्व काही सुरळीत सुरु होते. पण, नंतर तिला तिची नणंद आणि मेव्हण्याचे लफडे असल्याची माहिती समजली. हा प्रकार तिने तिच्या नवऱ्याला सांगितला. त्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. मात्र लफडे उघड का केले म्हणून विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळवाद कुटुंबातील संबंधित सदस्यांनी सुरु केला. तिच्यासोबत सदस्यांनी वाढविलेला वाद विकोपाला गेला. तद्वतच घरातील वादाला कंटाळून संबंधित महिला काही काळ पुण्यात राहायला गेली होती. या दरम्यान नवऱ्याने तिची समजूत घालून परत घरी आणले होते. काही काळ सर्व सुरळीत सुरु होते. पण, या महिलेने उघड केलेल्या लफड्याच्या तक्रारीबद्दलचा राग नवरा, नणंद आणि मेव्हण्याच्या मनात होता, असा आरोप पीडित महिलेने केला. ८ मार्च २०२५ रोजी पती, नणंद आणि मेव्हण्याने एकत्र येत तिला बेदम मारहाण केली. मेव्हण्याने गळा दाबण्याचा प्रयत्न केला. नणंदेने केस ओढले आणि पतीने लाथाबुक्यांनी मारहाण करत चारित्र्यावर संशय घेतला. त्यानंतर पतीने रागाच्या भरात तिच्या भुवयांवरून ट्रिमर फिरवत चेहरा विद्रुप केला आणि जबरदस्तीने मुंडन करण्यास भाग पाडले, असा गंभीर आरोप पीडित महिलेनं केला आहे.


### जीवे ठार मारण्याची धमकी

या प्रकरणाची कुठं तक्रार केली तर संबंधित महिलेसह तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी त्यांनी दिली होती. त्यामुळे पीडिता काही काळ गप्प होती. पण, हा त्रास असह्य झाल्यानं बहिणीच्या घरी धाव घेतली. त्यानंतर बार्शी पोलीस स्टेशनमध्ये याबाबत तक्रार केली आहे, अशी माहिती पीडितेनं दिली आहे.

### विविध कलमांखाली गुन्हा दाखल

बार्शीच्या या प्रकरणावरुन महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एका ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती, नणंद आणि मेव्हण्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बार्शी पोलिसांकडून सुरू आहे.

# अहो...आश्चर्य घडले, पालकमंत्री तृप्त झाले बडे नेतेही मनमुराद हसत पंगतीत बसले



सोलापूर : दिलीप माने यांच्या निवासस्थानी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भोजनाचा आस्वाद घेतला. याप्रसंगी आ.दिलीप सोपल, माजी आ.राजन पाटील, लक्ष्मण ढोबळे आदी.

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

सोलापूरच्या राजकारणात गुरूवारी आश्चर्य घडले. भाजप नेते तथा पालकमंत्री जयकुमार गोरे आणि काँग्रेस नेते माजी आमदार दिलीप माने यांची दोस्ती पहिल्यांदाच सोलापूरकरांना कळली. आपला मित्र येतो म्हटल्यानंतर माने यांनी होटगी रस्त्यावरील आपल्या निवासस्थानी गोरे यांना भोजनाचे आमंत्रण दिले होते. ते त्यांनी आनंदाने स्वीकारले. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास गोरे यांचे निवासस्थानी आगमन झाले.माने यांनी मनोभावे त्यांचे स्वागत केले. सर्वांनी उभे राहून गोरे यांना मान दिला आणि सुग्रास आमरसाच्या भोजनाला सुरूवात झाली. राऊंड टेबलवर गोरे, माने, मोहोळचे माजी आमदार राजन पाटील, लक्ष्मण ढोबळे, बार्शीचे आमदार दिलीप सोपल आणि पोलीस उपायुक्त विजय कबाडे, यावलकर हे दोन पोलीस अधिकारी बसले होते. भोजन घेत घेत गप्पांगण रंगले. कोपरखळी मारत कुणी एकमेकांच्या हातावर टाळी दिली तर कुणी कुणी विनोदातून हास्याचे फवारे उडवले.

मंत्री, खासदार, आमदार आणि बड्या राजकारण्यांचे भोजन म्हणजे सुग्रास असते. त्यांच्या जेवणात काय काय मेनू असतात, याविषयी सामान्यांमध्ये उत्सुकता असते.गरम पुरी,आमरस,बैगन मसाला,डॉलर जिलेबी,गरम चपाती,शेवगा भाजी आणि काकडीची कोशिंबिर,भजी असा मेनू होता. हा भोजन सोहळा भलताच रंगला.भोवताली कार्यकर्ते बसले होते. कुणाला काय पाहिजे याकडे माने हे आवर्जून लक्ष देत होते.भोवताली वाढपी होतेच.मित्राचा पाहुणचार घेवून पालकमंत्री तृप्त...तृप्त झाल्याचे दिसून आले.

### गोरे-मानेंची दोन ठिकाणी एकांतात चर्चा

गोरे आणि माने यांच्या भेटीविषयी बरेच तर्कवितर्क काढले जात आहेत.सोलापूर बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट असावी,असा तर्क काहींनी काढला. सुरूवातीला गोरे यांनी माने यांना शासकीय विश्रामगृहावर नाष्टा करण्यासाठी बोलावले. तिथे बंद खोलीत दोघेही बसले होते आणि काही वेळ चर्चाही झाली.दुपारी गोरे हे माने यांच्या निवासस्थानी आल्यानंतर पहिल्यांदा दोघेही एका खोलीत बसले होते. काहीवेळ चर्चा झाल्यानंतर दोघेही भोजनासाठी बाहेर आले.त्यामुळे बंद खोलीत काहीतरी चर्चा झाली असावी,असाही तर्क काढला जात आहे.


### सुभाषबापू, काळजी करू नका; मी काम भाजपचेच करणार

कोणी कितीही जवळ बसला आणि मी कोणाकडे जेवायला बसलो, तरी काम अगोदर भाजपच्या कार्यकर्त्यांचेच होईल. बापू (माजी मंत्री सुभाष देशमुख) मी सोलापूर जिल्ह्यात व्यक्तिगत राजकारण करायला आलो नाही, आपण माझ्यापेक्षा पक्षात आणि संघटनेत खूप ज्येष्ठ आहात. कोणीही चिंता करू नका, मी पक्षासाठीच काम करणार आहे. तुमचा वकील म्हणून काम करेन आणि तुमचा वकील हा मजबूत आहे, अशा शब्दांत गोरे यांनी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांच्याकडील स्नेहभोजनावरून सुरू असलेल्या चर्चेवर स्पष्टीकरण दिले.

### अनुमती घेवूनच जेवायला गेलो....

माझ्या प्रत्येक दौऱ्यात मी भाजपच्या आमदारांच्या घरी जेवण करतो. मात्र,काँग्रेस नेते दिलीप माने यांच्या घरी जेवण करतोय. ते माझे मित्र म्हणून मी माझ्या स्थानिक नेतृत्वाची परवानगी घेऊन त्यांच्या घरी स्नेहभोजनाला गेलो आहे. मात्र या भेटीवरून राजकीय गणितं मांडणं किंवा तसा कयास मांडणं मला योग्य वाटत नाही, असे गोरे यांनी स्पष्ट केले. मी माझ्या स्थानिक नेतृत्वाची परवानगी घेऊन त्यांच्या घरी स्नेहभोजनाला गेलो. त्यामध्ये कोणतीही राजकीय विषय किंवा राजकीय चर्चा झालेली नाही, असेही गोरे यांनी स्पष्ट केले.

# भूकंपाने पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा तालुके हादरले




भूकंपाचा केंद्रबिंदू

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर,सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यांमध्ये गुरूवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास भूकंपाचा सौम्य धक्का बसला. सांगोला येथे भूकंपाचा केंद्रबिंदू होता,असेही सांगण्यात आले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने याबाबतचे ट्विट करत माहिती दिली आहे. त्यामुळे, सोलापूरसह जिल्ह्यातील नागरिकांमध्ये काहीशी भीती पसरली आहे.३२ वर्षांपूर्वी किल्लारी भूकंपाच्यानंतर सोलापूर जिल्ह्याला भूकंपाचा विसर पडला आहे.एकमात्र इथे राजकीय भूकंप सतत होत असतात.त्याची सोलापूर जिल्हावासियांना सवयच झाली आहे मात्र,धरणीचा कंप झाला ही बातमी ऐकून किल्लारीचा भूकंप पुन्हा डोळ्यापुढे उभा राहिला. त्यावेळी सोलापूरसह जिल्ह्याला पहाटे सहा रिश्टरचे तीन धक्के बसले होते. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा येथे २.६ रेक्टर स्केल भूकंपाच्या तीव्रतेचे धक्के जाणवले आहेत. साधारणपणे सकाळी ११ वाजून २२ मिनिटांनी काही क्षणासाठी हे भूकंपाचे धक्के जाणवले असल्याची माहिती आहे. सुदैवाने या भूकंपाच्या धक्क्यामुळे कोणतीही पद्धतीची हानी झालेली नाही. मात्र, भूकंपाचे वृत्त समजताच नागरिकांच्या मनात काहीशी भीती निर्माण झाली आहे. सांगोला मतदारसंघात भूकंपाचे केंद्रस्थान होते.

### सोलापुरात नाही जाणवला

भूकंपाची वार्ता समजताच सोलापूर शहरात ठिकठिकाणी चौकशी केली असता धक्का जाणवला नाही,असे सांगण्यात आले.घरातल्या लोकांशी तसेच बाहेर सार्वजनिक ठिकाणी थांबलेल्या लोकांशी सुराज्यच्या प्रतिनिधीने संवाद साधला.भूकंप जाणवला नाही,असे त्यांनी सांगितले.

### पंढरपूर शहर व तालुक्यात सौम्य भूकंपाचे धक्के


**पंढरपूर :** पंढरपूर शहर व तालुक्यात काल सकाळी ११ वा भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याची माहिती समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे भूकंपाचा केंद्रबिंदू असल्याचे समजते. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने याबाबतचे ट्विट करत माहिती दिली आहे. त्यामुळे पंढरपूर शहर व ग्रामीण भागात नागरिकांमध्ये भीती पसरलेली आहे. पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा येथे २.६ रेक्टर स्केल भूकंपाच्या तीव्रतेचे धक्के जाणवले आहेत. साधारणपणे काल सकाळी ११ वाजून २५ मिनिटांनी काही क्षणासाठी हे भूकंपाचे धक्के जाणवले असल्याची माहिती आहे. सुदैवाने या भूकंपाच्या धक्क्यामुळे कोणत्याही पद्धतीची जिवंत व वित्त हानी झालेली नाही. भूकंपाचे वृत्त समजताच नागरिकात भिती निर्माण झाली आहे. सांगोला तालुक्यात भूकंपाचे केंद्रस्थान आहे.

**गावोगावी चर्चा**

**सांगोला :** भूकंपाची वार्ता पसरल्यानंतर गावोगावी भूकंपाची चर्चा होऊ लागली सांगोला तालुक्यातील सांगली, विजापूर सोलापूरच्या सीमेवर असलेल्या गावातील नागरिकांना विचारले असता त्यांनी सांगितले की मंगळवारी १ एप्रिल २५ रोजी सकाळी ११ वाजता व दुपारी दोन ते तीन च्या दरम्यान वीज कडाडल्यासारखा ॲटम बॉम्ब उडाल्यानंतर जसा आवाज ऐकू येतो, तसा आवाज त्या दिवशी ऐकू आल्याने तसेच घरातील भांडीकुंडी थरथरल्या होत्या.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आपल्याला काळजी आपल्या बोर्डाची !

# चिता पेटवताना डिझेलच्या भडक्याने तिघेजण जखमी

✔ सोलापूर/प्रतिनिधी




चिता रचून सरण पेटवत असताना झालेल्या डिझेलच्या भडक्यात तिघेजण भाजून जखमी झाले. ही घटना दिंडूर (ता.दक्षिण सोलापूर) येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

तानाजी शंकर जाधव (वय ४५), सूर्यकांत कल्लप्पा कोळी (वय ४७),आणि बाबुराव महादेव जाधव (वय ५१ सर्व रा.दिंडूर ता.दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत.

त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते तिघेजण बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास नातेवाईकाचे निधन झाल्याने दिंडूर येथील स्मशानभूमीत गेले होते. शव चितेवर ठेवून डिझेल ओतून सरण पेटवण्यात आले त्यावेळी अचानक आगीचा भडका उडाल्याने तिघेजण भाजून जखमी झाले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# वृद्धाची विष पिऊन आत्महत्या

✔ **सोलापूर :** सवतगाव (ता.माळशिरस) येथे राहणाऱ्या महादेव भीमराव मोरे (वय ७०) यांनी विषारी द्रव पिऊन आत्महत्या केली. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास त्यांनी राहत्या घरात पिकावर फवारणीचे विषारी द्रव प्राशन केले होते. त्यांना अकलूज येथे प्राथमिक उपचार करून पार्वती (पत्नी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.

उपचारादरम्यान ते बुधवारी सायंकाळच्या सुमारास मयत झाले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

# रामपूर येथे विहिरीत पोहताना तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर :** विहिरीत पोहताना पाण्यात बुडाल्याने १९ वर्षीय तरुण मरण पावला. ही घटना रामपूर (ता.दक्षिण सोलापूर) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.

गौस मोहम्मद कोरबू (वय १९ रा.नवीन घरकुल कुंभारी) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. ता बुधवारी रामपूर येथील नातेवाईकांच्या शेतात गेला होता. दुपारी चारच्या सुमारास तो तेथील विहिरीत पोहण्यासाठी गेला होता.पाठीला थर्माकोल बांधून पोहत असताना अचानक थर्माकोल निसटल्याने तो पाण्यात बुडाला.विहिरीत पाणी भरपूर असल्याने मदत कार्यास विलंब झाला. सायंकाळच्या सुमारास त्याला पाण्यातून बाहेर काढून कलीम शेख (काका) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत गौस कोरबू हा अविवाहित असून तो फर्निचरचे काम करीत होता. त्याच्या पश्चातत आई,आजी आणि मामा असा परिवार आहे.या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली आहे.

# वाळू माफियांवर थेट एमपीडीअंतर्गत कारवाई होणार : पालकमंत्री

## विमानसेवेची तारीखही लवकर जाहीर होणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील शासकीय वाळू ठेक्यावर डल्ला मारणाऱ्या ५ वाळू चोरावर एमपीडी केली आहे. यापुढे वाळू चोरणाऱ्यांची गय केली जाणार नाही. त्यांच्यावर कडक कारवाईचा बडगा उचलण्यात येईल, असा इशारा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला आहे. येत्या काही दिवसात सोलापुरातून विमासनेवा सुरू होईल त्याची तारीखही लवकरच जाहिर होईल असेही गोरे म्हणाले.

पालकमंत्री गोरे यांनी नियोजन भवनमध्ये विविध विभाग प्रमुख, अधिकाऱ्यांची बैठक घेतील, त्यानंतर ते बोलत होते. सोलापूर शहरातील दुहेरी पाईपलाईनचे काम पूर्णत्वाकडे नेण्यासाठी शासन स्तरावर हालचाली सुरू आहेत. सोलापूर ते मुंबई विमानसेवा सुरु होण्याच्या मार्गावर असून येत्या काही दिवसांत तारिख फायनल होणार असल्याचे गोरे म्हणाले.



शासनाच्या घरकुल योजनांसाठी वाळू आवश्यक आहे.शासन स्तरावर वाळू स्वस्त मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. मात्र हीच वाळू माफिया चोरून उपसा व विक्री करत असल्याचे दिसून आले आहे. आता वाळू माफियावर एमपीडी दाखल करण्यात येणार आहे. सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा परिषदेमधील आरोग्य अधिकऱ्यांच्या कारवाईचा प्रस्ताव शासन स्तरावर चौकशी सुरू असून कार्यवाही सुरू आहे. सोलापूर शहराचा विकासाच्या दोन्ही बाजूने विचार करता वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल आवश्यक आहे. मात्र येथील काही व्यापाऱ्यांना व्यवहार करण्यासाठी अडचणी निर्माण होणार आहेत. दोन्ही बाजूने निर्णय घेण्यात येईल मात्र या निर्णयामुळे जनता व व्यापारी दुखावला जाणार नाही, असे देखील गोरे म्हणाले.

### सर्वांना सोबत घेऊनच काम करणार

आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी हे दौऱ्यात कुठेही दिसले नाहीत, याची विचारणा केली असता गोरे म्हणाले की, काही वैयक्तिक कामानिमित्त ते उपस्थित राहू शकले नाहीत. भविष्यात मी सर्वांना सोबत घेऊनच काम करणार आहे.

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 234-95-140 |
| संगम श्री नाईट | 600-61-245 |
| कल्याण | 178-61-560 |
| मुंबई | 589-27-115 |

CMYK